IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाराष्ट्रातील जातीचे राजकारण

**प्रा. डॉ. सुपेकर व्ही.पी.**

राज्यशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे.

**Article Info**

***Article History:***

Received: 20th February 2026

Accepted: 01st March 2026

Published: 07th March 2026

***Keywords:***

*राजकीय नेतृत्व, जातीचे राजकारण*

**ABSTRACT**

राजकीय नेतृत्व हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे केंद्रबिंदू मानले जाते. समाजाच्या आकांक्षा, मूल्ये आणि अपेक्षा शासनव्यवस्थेत प्रतिबिंबित करण्याचे कार्य राजकीय नेतृत्व करते. प्रभावी राजकीय नेतृत्वामुळे राष्ट्राची सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगती साध्य होते. प्रस्तुत संशोधनपर लेखात महाराष्ट्रातील जातीचे राजकारण या विषयावरील भूमिका मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.'जी जात नाही ती जात' या संकल्पनेची व्याख्या रजनी कोठारी यांच्या पुस्तकामध्ये आढळते. भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या अनेक घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून जात व जातिवादाकडे पाहिले जाते .

***Plagiarism Check Report:***

Date of Report: March 01, 2026

Similarity Index: 2%

Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Supekar, V. P. (2026). महाराष्ट्रातील जातीचे राजकारण. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), 710–715.

**प्रस्तावना -**

राजकीय नेतृत्व हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे केंद्रबिंदू मानले जाते. समाजाच्या आकांक्षा, मूल्ये आणि अपेक्षा शासनव्यवस्थेत प्रतिबिंबित करण्याचे कार्य राजकीय नेतृत्व करते. प्रभावी राजकीय नेतृत्वामुळे राष्ट्राची सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगती साध्य होते. प्रस्तुत संशोधनपर लेखात महाराष्ट्रातील जातीचे राजकारण या विषयावरील भूमिका मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.'जी जात नाही ती जात' या संकल्पनेची व्याख्या रजनी कोठारी यांच्या पुस्तकामध्ये आढळते. भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या अनेक घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून जात व जातिवादाकडे पाहिले जाते .

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीमध्ये ऐरणीवरील मुद्दा जातिवाद हा होता भारतीय चातुर्णीय व्यवस्थेने काही समाज घटकांना समाजापासून उच्चभ्रू जातीपासून दूर केले ज्या वर्णव्यवस्थेतून जाती उदयास आल्या सामाजिक व्यवस्थेच्या व्यवसायाचा भाग म्हणून त्या जोपासल्या गेल्या त्यानंतर कायमस्वरूपी संबंधित वर्णनाला चिकटल्या गेल्या वर्णव्यवस्थेतून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या जाती बाहेर पडल्या गेल्या यातूनच पुढे स्पृश्य अस्पृश्यता वाढली. सवर्ण दलित हा जातीभेदाचा नया आयाम समोर आला समाज हा जातीनिहाय विभागला गेला. प्रत्येक जातीची चौकट, नियम ठरले गेले . स्वातंत्र्योत्तर काळामध्ये ज्या जातींना सत्ता कारणापासून दूर लोटले त्याच जातींना अथवा जाती समूहांना मतदानासाठी ओल्ड बँक म्हणून राजकीय नेतृत्वांनी जवळ केले थोडक्यात सत्तेत अधिक जास्त वाटा असणाऱ्या राजकीय नेतृत्वांनी सत्तेसाठी जातीयतेचा आधार घेतला त्यातून जातिवादाची बीजेपीरली गेली. ज्या प्रदेशात ज्या जातींचे प्राबल्य अधिक आहे अशा प्रदेशातील स्थानिक नेतृत्वाला राजकारणामध्ये ओढण्यासाठी राजकीय नेतृत्व पुढे सरसावले कनिष्ठ जातींचा प्रवेश या निमित्ताने राजकारणामध्ये झाला जात हे राजकीय संघटनांचे एक साधन बनले यामुळेच रजनी कोठारेंनी जातीचे राजकीय करण होत असल्याचा निष्कर्ष काढला. जात हा मराठी शब्द जन या संस्कृत शब्दापासून असून त्याचा अर्थ जन्म असा होतो.

जात म्हणजे जन्माने प्राप्त होणारा समूह होय जात या मराठी शब्दासाठी कास्ट हा इंग्रजी प्रतिशब्द वापरला जातो कास्ट हा कास्ट या पोर्तुगीज शब्दापासून त्याची निर्मिती झाली आहे कास्ट या शब्दाचा अर्थ जन्म वंश असा होतो या अर्थावरून जात म्हणजे असा समूह ज्यांचे सदस्यत्व हे जन्मावर आधारलेले असते.

**भारतीय राजकारणामध्ये जातीची भूमिका :-**

जात हा भारतातील किंवा प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे जातीव्यवस्थेतील विषमतेमुळे सत्ता वाटप देखील विषम पद्धतीने होते. उच्च जातींनी आपल्या जातीय स्थानाच्या आधारे सत्तेचा जास्तीत जास्त वाटा मिळवण्याचे प्रयत्न केले, तर कनिष्ठ जातींना स्वातंत्र्यानंतरच्या काळातही सत्तेपासून दूर राहावे लागले तरीही निवडणुका आणि लोकशाही पद्धतीचे राजकारण यांचा जातीवर परिणाम झालाच जात हे राजकीय संघटनांचे एक साधन आहे त्यामुळे यामुळे रजनी कोठारेंनी जातीचे राजकीय करण होत असल्याचा निष्कर्ष काढला. एन एन श्रीनिवास या समाजशास्त्रज्ञाने वर्चस्वशाली जात ही संकल्पना मांडून जात आणि राजकारण यातील परस्पर संबंधाची चर्चा केली . त्यांच्या मते स्थानिक पातळीवरील बहुसंख्य असलेली आणि वरचा दर्जा असलेली जात शिक्षण आधुनिक व्यवसाय यात प्रगती साधते आणि स्थानिक राजकारणात वर चष्मा गाजवू लागते या प्रकारे ती

जात वर्चस्वाली जात बनते . परंतु रजनी कोठारेंनी वर्चस्वशाली जात या संकल्पने ऐवजी प्रस्थापित जात असा शब्दप्रयोग केला त्यांच्या मते प्रस्थापित जात संख्येने मोठी असल्याची गरज नसते कारण त्या जातीच्या राजकीय वर्चस्वाचे मूळ तिच्या वरिष्ठ दर्जात आणि त्यातून येणाऱ्या आर्थिक बळात असते. स्वातंत्र्योत्तर राजकारणावर प्रामुख्याने वरिष्ठ जातींचाच पगडा राहिला. लोकशाही चौकटीत देखील आपले वर्चस्व कायम ठेवण्यात वरिष्ठ जाती बऱ्याच काळ यशस्वी झाल्या इतकेच नाही तर उच्च जातीच्या राजकीय स्थानाला धक्का लावला पाहिजे अशी भूमिका कोणत्याच राजकीय पक्षाने घेतली नाही, परंतु उत्तर भारतातील समाजवादी नेतृत्व राम मनोहर लोहिया यांनी मात्र मागासलेल्या जातींचे राजकारण केले पाहिजे असा आग्रह धरला स्वातंत्र्यपूर्व काळात जातीचा मागासलेपणा आणि राजकारण यांचा एकत्रित विचार करण्यासाठी खंबीर पावले उचलण्याचे श्रेय महाराष्ट्रातील तीन विचारवंतांकडे जाते हे तीन विचारवंत म्हणजे महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतीय समाजात उच्च जातींचे हितसंबंध आणि कनिष्ठ जातींचे हितसंबंध यामध्ये अंतर विरोध आहे याची प्रभावी आणि सुस्पष्टता मांडणी ज्योतिबा फुले यांनी केली . आपल्या सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून शेठजी भडजीविरुद्ध शुद्रातील शूद्र असे दोन समाज गट असल्याचे दाखवून दिले छत्रपती शाहूंनी ब्राह्मणे तर चळवळीतून कनिष्ठ जातींनी लढा देऊन राजकीय स्पर्धेत सत्तेसाठी दावा करावा यावर भर दिला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मुख्यतः दलित जातीच्या राजकीय अधिकारांचा मुद्दा उपस्थित करून दलितांचे संघटन केले जातिबद्ध समाजात राजकीय सत्तावाटप होताना त्यात कनिष्ठ जातींना कमी वाटा मिळणार म्हणून राजकीय हक्क व सत्ता यासाठी कनिष्ठ जातींनी लढा द्यावा यावर फुले शाहू आंबेडकर या तिघांचा भर होता याचा परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात पुढे असा झाला की 1970 नंतर उत्तर भारतातील मागा जातींचे राजकीय संघटन होण्यास संघटन होण्यास आरंभ झाला 1977 नंतर दलितांखेरीज इतर मागा जातींना राजकारणात राखीव जागा देण्याचा मुद्दा पुढे आला म्हणून याच सुमारास इतर मागास जातींमधून राजकीय नेतृत्व ही उभे राहू लागले होते त्यामुळे राखीव जागांच्या निमित्ताने मागास जातींचे राजकारण साकारू लागले जात आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधामुळे माघार जाती समूहाचे राजकारण महत्त्वाचे बनले.

**प्रादेशिक पक्ष आणि जातीवाद :-**

प्रादेशिक पक्ष जनाधार मिळवण्यासाठी विविध वैचारिक भूमिकांचा पाठपुरावा करीत असतात. त्यात अनेक वेळा प्रादेशिक अभिमानाला स्थान असते तर कधी जातीय राजकारणाला असते स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकारणात प्रादेशिक पक्षांनी जातीवादी भूमिका पार पाडली . स्वातंत्र्यपूर्व काळात सुद्धा जातीच्या आधारावर पक्षनिर्मिती झाली होती. स्वातंत्र्यपूर्व मद्रास राज्यात जस्टिस पार्टी स्थापना व मुंबईतील इंडिपेंडेंट पार्टी याची निर्मिती जाती आधारावरच होती. रिपब्लिकन पक्ष भारतीय दलितांचे प्रातिनिधिक संघटन होते पुणे करारानंतर महात्मा गांधींनी हरिजन उद्धाराची चळवळ वेगवान केली असली तरी डॉ. बाबासाहेब याबाबत संतुष्ट नसल्यामुळे त्यांनी 1938 लेबर पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची स्थापना केली. त्याचप्रमाणे 1942 मध्ये त्यांनी अखिल भारतीय पातळीवर शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना केली. यापूर्वीची एक बाब म्हणजे ब्रिटिशांनी गोलमेज परिषदेनंतर अस्पृश्यांसाठी वेगळा मतदार संघाची योजना जातीय निवाडा म्हणून घोषित केली याचा आधार देखील जातिवाद हाच होता. 1885 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली या संघटना वजा पक्षात अनेक संख्येने मोठे शेतकरी ग्रामीण शेतकरी

व छोट्या-मोठ्या खेड्यातील दुर्बल जातींचे लोकही होते. एकूण स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जातीचा प्रवेश हा ज्या जाती उच्चवर्णीयांपासून दुर्लक्षित करण्यात आल्या होत्या ज्यांची गळचपे होत होती अशा जातींनी जातीवादी भूमिकेतून राजकारणामध्ये प्रवेश मिळवला आपल्या समस्या सोडवण्याचा व ब्रिटिशांच्या धोरणाला तडा देण्याचा प्रयत्न केला हा सकारात्मक दृष्टिकोन स्वातंत्र्यपूर्व काळात जातीवादाच्या संदर्भात सांगता येतो.

**जातींचे प्रादेशिक वर्चस्व :-**

जात आणि राजकारण यांचे संबंध सर्व राज्यांमध्ये एकसारखे कधीच नव्हते. कारण विविध जातीचे लोकसंख्येतील स्थान राज्या राज्यात भिन्न आहे. त्याचबरोबर शिक्षण राजकीय जागृती आणि सहभागाच्या परंपरा ही वेगळ्या आहेत मोठ्या प्रदेशात पसरलेल्या जातींचा प्रादेशिक पातळीवरील वर्चस्ववादी जाती म्हणून उदय होण्याची प्रक्रिया 1950 च्या दशकात घडून आली. जवळपास प्रत्येक राज्यात राजकारण एक किंवा दोन मोठ्या प्रभावशाली जातीभोवती किंवा जाती गटाभोवती फिरू लागले. उत्तर भारतात जातीव्यवस्थेत फार सावकाश स्थित्यंतरे घडली. त्यामुळे पुढारलेल्या जाती आणि मागास जाती यांच्यातील दरी तेथे जास्त राहिली. याउलट महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जातीच्या चळवळीमुळे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धातच जातींच्या प्रश्नांचे भान यायला सुरुवात झाली . दक्षिणेकडे पूर्वीच्या मद्रास प्रांतात पेरियारांच्या चळवळीमुळे जातींच्या प्रश्नावर संघटन सुरू झाले. आरंभी वरिष्ठ जातींच्या उच्च दर्जाचा आणि संपन्नतेचा निषेध करणाऱ्या चळवळींनी कालांतराने प्रादेशिक पातळीवर सत्तेसाठी दावा करायला सुरुवात केली. या प्रक्रियेत तीन गोष्टी घडून आल्या विविध उपजाती एकत्र येऊन जाती अस्मिता तयार झाली विभिन्न भागातील जातीचे एकीकरण झाले अनेक जातींनी एकत्र येऊन उच्च जातींना विरोध केला.

**महाराष्ट्रातील जातीचे राजकारण –**

महाराष्ट्र राज्याची स्थापना 1960 मध्ये झाली तेथून पुढे महाराष्ट्राच्या राजकारणाचा नूतन प्रवास प्रारंभ झाला. महाराष्ट्र राज्य स्थापनेपूर्वी काँग्रेस वर्चस्वाची चौकट आकार घेत होती महाराष्ट्राच्या संदर्भात काँग्रेस वर्चस्वाची खास वैशिष्ट्ये होती. इतर राज्यात काँग्रेस वर्चस्वाला धक्के बसत असताना मात्र महाराष्ट्रात काँग्रेस वर्चस्व 1975- 76 पर्यंत आबाधित राहिले याचे एकमेव कारण म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व काँग्रेस सत्ता बळकट करत होते म्हणून अनेक वेळा महाराष्ट्रात काँग्रेसच्या वर्चस्वाचे वर्णन चव्हाण मॉडेल असे केले जात होते. यशवंतराव चव्हाण यांचे या संदर्भातील श्रेय वादादीत आहे. परंतु दीर्घकाळ हे वर्चस्व टिकून राहण्यात अनेक आधारभूत घटक आहेत हे आपल्याला सांगता येईल महाराष्ट्र मध्ये मराठा कुणबी समाजाच्या मध्यवर्ती स्थानाचा उल्लेख करावा लागतो. भारताच्या कोणत्याही राज्यात एकाच जातीसमूहाचे एवढ्या मोठ्या प्रमाणात संख्याबळ कोठेही आढळत नाही. महाराष्ट्र राज्य की मराठा राज्य असा प्रश्न महाराष्ट्र राज्य निर्माण होत असताना विचारला गेला होता म्हणून एवढे मोठे संख्याबळ असल्यामुळे समान जातिभान निर्माण करणे मराठी नेतृत्वाला शक्य झाले महाराष्ट्रातील राजकारणात मराठी कुणबी नेतृत्वाने जी भूमिका बजावली तिचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विशिष्ट हितसंबंध आणि व्यापक सामाजिक वास्तव यांची सांगड घातली. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर पुढील दोन दशकात महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसचे वर्चस्व टिकून राहिले. त्याचे कारण

म्हणजे वैचारिक परिवर्तन हे सांगता येईल. काँग्रेसचे राजकारण आणि मराठा समाजाचे पुढारीपण यांचे समर्थन दोन प्रकारांनी करण्यात आले. बहुजन समाजाची सत्ता हा एक शब्दप्रयोग आणि बेरजेचे राजकारण हा दुसरा शब्दप्रयोग बहुजन समाजाचे राज्य महाराष्ट्राच्या मानसिकतेत दीर्घकाळ टिकून राहिला. यातून मराठा कुणबी समाजाचे राजकारण उभे राहिले मराठा कुणबी नेतृत्वाने अन्य जातींना अल्पसा वाव देत सर्व ब्राह्मणेतर जातींचे नेतृत्व स्वतःकडे ठेवले. सवर्ण व दलित नेतृत्वाचे काँग्रेसमध्ये समावेश करण्याचे प्रयत्न देखील केले परंतु या मराठा राजकीय नेतृत्वात 1977 नंतर फाटाफूट झाली. महत्त्वपूर्ण बाब म्हणजे महाराष्ट्रातील जातीवादी राजकारणाने वेगळी कलाटणी घेत 1990 नंतर काँग्रेस व मराठा वर्चस्वाला पर्यायी शक्ती सेना भाजप या रूपाने उभे राहिल्या. याच काळात मराठा राजकीय नेतृत्वाने बहुजनवादी जातींचे राजकारण करत ओबीसी राजकारणात गती दिली, परंतु 1995 ला सेना-भाजप युतीचे सरकार आले हिंदुत्ववादी राजकारणाने उचल खाली. 1996 नंतर ओबीसी जातीचे राजकारण थंडावले. दलित राजकारणाच्या तर फार मोठ्या प्रमाणावर टिकऱ्या उडाल्या. मराठा वर्चस्व विरुद्ध ओबीसी जातीय राजकारण साकारता आज महाराष्ट्रात दोन्ही गटांची फाटा फूट जास्त झालेली आहे. शेती क्षेत्रातील पेच प्रसंग, रोजगाराचे प्रश्न आणि त्यातून मराठा समाजात निर्माण झालेली अस्वस्थता त्या अस्वस्थतेतून पुढे आलेले मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन या खद्खदत्या पार्श्वभूमीवर सहाही प्रमुख पक्षाने लोकसभेला मराठा उमेदवार अधिक देण्याचा प्रयत्न केला. मराठा आंदोलनाचा प्रभाव लक्षात घेता यावेळी सर्वच राजकीय पक्षांनी मराठा समाजातील उमेदवार मोठ्या संख्येने दिलेले दिसतात. त्या तुलनेत ओबीसी उमेदवार देण्याचे प्रमाण सर्वच पक्षात कमी होते. भाजपने सर्वाधिक म्हणजे सहा ओबीसी उमेदवार दिले. काँग्रेसने चार तर शरद पवार गटाने दोन ओबीसी उमेदवार दिले. ठाकरे गट, शिंदे गट आणि अजित पवार गटाने प्रत्येक प्रत्येकी एक ओबीसी उमेदवार दिला होता लोकसभा निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातून इतर जातींच्या तुलनेत मराठा उमेदवार अधिक संख्येने निवडून जातात. मराठा समाजाची अधिक लोकसंख्या आणि राज्यभर व्याप्तीमुळे हे साहजिकच दिसले तरी लोकसभेच्या एकूण 48 जागांपैकी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या मिळून नऊ राखीव जागा वगळता 39 खुल्या जागांमधून मराठा उमेदवार निवडून येण्याचे प्रमाण हे सरासरी 50% आहे.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रातील नेतृत्वामध्ये जाती या घटकाचा अभ्यास करत असताना हे स्पष्ट होते की महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राजकीय सत्ता पटलावर जे नेतृत्व बदल झालेले आहेत, त्यामध्ये जात हा घटक जास्त महत्त्वाचा ठरलेला दिसतो. महाराष्ट्राच्या सत्ता पटलावर सर्वाधिक काळ नेतृत्व हे मराठा समाजाचे होते मात्र शाहू फुले आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महाराष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर तब्बल 43 वर्षानंतर सुशील कुमार शिंदे यांच्या रूपाने दलित नेतृत्वाच्या हाती सत्तेची सूत्रे आली. महाराष्ट्रात जातीवादावर आधारित राजकीय पक्षांची जातीय संघटनांची जातीय दबाव गटांची व जातीय खाजगी संघटनाची निर्मिती झालेली दिसून येते. राजकारणातील जातीयवादांच्या वाढत्या प्रभावाने विचारसरणीचा भंग होऊन राजकीय पक्ष बेजबाबदार बनले. यामुळे राजकीय एकात्मतेस तडा गेल्याचे दिसून येते. निवडणुकीच्या काळात जातीवाद अधिक फोफावतो म्हणून सार्वत्रिक निवडणुकात राजकीय पक्ष आपल्या पक्षाची उमेदवारी देताना त्या मतदारसंघातील जातीचे प्राधान्य लक्षात घेताना

दिसतात म्हणजेच उमेदवाराची कार्यक्षमता व बुद्धिमत्ता लक्षात न घेता जातीचा निकष महत्त्वाचा ठरत असल्याचे अभ्यासातून दिसून येते.

**संदर्भ** –

१. 1पळशीकर सुहास समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन पुणे 2004 पृष्ठ क्रमांक 129.

२. महाराष्ट्राचे जात वास्तव साधना मासिक एक मे 1999 पृष्ठ क्रमांक 05.

३. पळशीकर सुहास समकालीन भारतीय राजकारण प्रतिमा प्रकाशन पुणे 2004 पृष्ठ क्रमांक 103

४. शिरसीकर व. म. आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2008 पृष्ठ क्रमांक 73

५. विवेक घोटाळे,मुक्ता कुलकर्णी,विश्लेषण-महाराष्ट्राच्या राजकारणावर जातीचा किती आणि कसा प्रभाव पडला? बी.बी.सी. न्यूज मराठी, १०जून २०२४